महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
जिल्हा रुग्णालय,नाशिक
अनंत कान्हेरे मैदान समोर, त्रंबकरोड नाशिक-४२२००२
ध्वनी क्रमांक:- २५७२०३८ Email ID: cs__nashik@rediffmail.com

# जाहीर नोटीस ( दरपत्रके आमत्रंण पत्र )

सुचित करण्यात येते की,जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक कार्यालयामार्फत सन २०२५-२०२६ मध्ये उपलब्ध होणाऱ्या कार्यालयीन खर्चाच्या अनुदानातुन इंटरकॉम ईक्विपमेंट/इपीएबीएक्स सिस्टीम/अशा इतर दुरध्वणी दळणवळण व संभाषण दळणवळण इत्यादी साधन सामग्री सुस्थितीत ठेवण्या संबधीतचा देखभाल दुरुस्ती करार व कार्यालयात बसविण्यात आलेल्या दुरध्वनीयंत्राला आवश्यक असलेले प्लग आणि सॉकिट जोडणीसाठी वायर,दुरध्वणी संच इत्यादी बाबत दर मागविण्याचे निश्चित केले आहे. तरी इच्छुक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत प्रशासकीय कार्यालय, जिल्हा रुग्णालय, नाशिक येथे सादर करावे व पोहच प्राप्त करुन घ्यावी तसेच उपरोक्त इ.मेल व्दारे दरपत्रक, सादर केलेचे अवगत करावे.मोहरबंद तांत्रिक व व्यापारील लिफाफा स्वतंत्र सादर करण्यात यावा.

## दरपत्रके सादर करण्याऱ्यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधारण अटी व शर्ती -

०१) इच्छुक पुरवष्ठाधारकांनी बाबनिहाय ( Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत.यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे.त्याचे नांव असावे.

०२)एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे.कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असु नये. असे थेट स्वारस्य असल्यास ती हितसंबधाचा संघर्ष म्हणुन समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकरण्यात येतील.उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी / प्रकल्पासाठी / निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्ती कंपनी एक्स चा मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती कंपनी वाय ची मालक / संचालक / भागिदार / बहुसंख्य भागधारक नसावी

०३)निर्माणकर्त्याचा अधिकृत विक्रेता, ठोक व्यापारी यांना दरपत्रक सादर करता येतील दरपत्रकात पुरवठा करण्यात येणाऱ्या बाबी बददलची सविस्तर माहिती जसे मौटेल, मेक इत्यादी नमुद करणे आवश्यक आहे यादीत विर्निदिष्ट पुरवठा करणे बाबतचा पुर्वानुभव दाखला जोडण्यात यावा.

०४)आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्र. (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड ची छायांकीत प्रत साक्षांकित करुन जोडावी.

०५)संस्था/दुकान,साहीत्य/पुरवठा/विक्री विषयक वैध नोंदणी दाखला सोबत जोडावा.

०६)दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता / ठिकाण - प्रशासकीय कार्यालय, जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक जिल्हा रुग्णालय, नाशिक आवार, त्रंबकेश्वर रोड, नाशिक. पिन कोड ४२२००१.

०७)यादी मधील (रुग्णालयीन वापरसाठी लागणारे नित्यउपयोगी वस्तु) आवश्यकते नुसार खरेदी केली जातील.

Scanned with ACE Scanner

०८)विहीत कालावधीत पुरवठा न झाल्यास शासकीय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

०९)विहीत नमुन्यातील वस्तुवा सेवा कर(GST Number) सहित देयके स्विकारण्यात येतील. दर हे सर्व करांसहित व उचल ठेव इमाली पोहच खर्चासहीत असावे.

१०)खरेदी केलेल्या बाबीची पोहच जिल्हा रुग्णालय,नाशिक येथे करावी लागेल.

११)मंजुर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम न्युनतम दर धारकांकडुन वसुल केली जाईल.

१२)दर हे अधीकतम विक्री किंमतीपेक्षा (MRP) जास्त नसावे. वस्तु व सेवांच्या दराबाबत शासकीय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना शासन निर्णय,परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असेल.

१३)(रुग्णालयीन नित्यउपयोगी वस्तु) दर्जा हा सर्वोत्तम असावा. वस्तु हया आय एस आय (ISI MARK) मार्क किंवा आयएसआय मार्कशी समांतर दर्जाधारक असावा.

१४)स्थानीक पुरवठा दारांना प्राधान्य राहील तसेच इच्छुक पुरवठाधारकास कोणत्याही शासकीय विभागाने खरेदी प्रक्रियेसाठी काळ्या यादीत टाकलेले नसल्या बाबतचे प्रमाणपत्र न्यायिकेतर मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) लिहुन देणे बंधनकारक आहे.

१५)दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांकापासुन आठ दिवस संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल(कार्यालयीन सुटटी वगळुन)उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१६)दरपत्रके उघडण्याची तारीख या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

१७)दरपत्रकासोबत सादर करण्यात येणारे दस्तावेज(कागदपत्रे) राजपत्रित अधिकारी किंवा शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याकडुन साक्षांकित करुन सादर करावे.

१८)कोणतेही लेखी तोंडी कारण न देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपुर्ण अथवा काही भागाची खरेदी प्रकिया स्थगित ठेवण्याचे व खरेदीचे सर्व अधिकार जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी राखुन ठेवले आहेत. मान्य न्युनतम दर हे दर स्विकृत केल्या पासुन एक वर्षासाठी वैध राहतील.

( डॉ. चारुदत्त शिंदे )
जिल्हा शल्य चिकित्सक,नाशिक.

Scanned with ACE Scanner